DOWNLOADED FROM: https://iasexamportal.com/





# मराठी

( अनिवार्य )

वेळ : तीन तास

कमाल अंक : 300

## प्रश्नपत्रिकेशी संबंधित सूचना

**प्रश्न सोडविण्यापूर्वी पुढीलपैकी प्रत्येक सूचना काळजीपूर्वक वाचा**

सर्व प्रश्न सोडवायचे आहेत.

प्रश्नाचे गुण त्या त्या प्रश्नासमोर दिलेले आहेत.

प्रश्नामध्ये वेगळा निर्देश केलेला नसेल तर प्रश्नांची उत्तरे मराठीत (देवनागरी लिपीमध्ये) लिहावयाची आहेत.

जेथे जेथे शब्दसंख्येची मर्यादा प्रश्नामध्ये सांगितलेली असेल, तेथे तिचे पालन केलेच पाहिजे. सांगितलेल्या शब्दसंख्येपेक्षा खूप जास्त अथवा खूप कमी शब्दांत उत्तर लिहिलेले असल्यास गुण कमी केले जाऊ शकतात.

प्रश्न-उत्तर पुस्तिकेतील कोणतेही पृष्ठ कोरे सोडल्यास त्यावर स्पष्टपणे काट मारावी.

# MARATHI

**( Compulsory )**

Time Allowed : Three Hours

Maximum Marks : 300

## QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

**Please read each of the following instructions carefully before attempting questions**

All questions are to be attempted.

The number of marks carried by a question is indicated against it.

Answers must be written in MARATHI unless otherwise directed in the question.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to and if answered in much longer or shorter than the prescribed length, marks may be deducted.

Any page or portion of the page left blank in the answer-book must be clearly struck off.



DOWNLOADED FROM: https://iasexamportal.com/ Courtesy : UPSC

DOWNLOADED FROM: https://iasexamportal.com/

**1.** खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर *600* शब्दांत निबंध लिहा : 100

*(a)* सर्जनशीलतेचे पोषण करणाऱ्या शिक्षणाची गरज

*(b)* भारतातील वन्यजीवांच्या संरक्षणाची आव्हाने

*(c)* किशोरांच्या मानसिकतेवर चित्रपटांचा परिणाम

*(d)* दिव्यांगांचे सक्षमीकरण

**2.** पुढील उतारा काळजीपूर्वक वाचा आणि उताऱ्याच्या शेवटी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे सुस्पष्ट, योग्य व संक्षिप्त भाषेत लिहा : 12×5=60

काही हजार वर्षापर्यंत मनुष्य पृथ्वीवर शिकारी म्हणून होता. नव-पाषाण युगापर्यंत तो शेतीसाठी स्थायिक झाला नव्हता. दूरस्थ भागात न जाता तो शेतीची मशागत करून अन्नाचे उत्पादन वाढविण्यास तो सक्षम झाला आणि सातत्याने शेतीचा विकास करण्यासाठी प्रयत्नशील राहिला. आजपावेतो तो पूर्वीच्या तुलनेत अधिक आणि उत्तम शेतीचे उत्पादन घेण्यास समर्थ राहिला आहे. परंतु जोपर्यंत सागराचा संबंध आहे तो-पर्यंत तो जवळजवळ शिकारीच आहे. तो मासे आणि इतर जलचरांना पकडतो परंतु त्यांची सतत वाढ आणि पूर्तता कायम ठेवण्यासाठी मर्यादितच प्रयत्न करीत आहे. आजपर्यंत जलचरांच्या शिकारीमुळे त्याला सर्वाधिक पोषक प्रोटीनची प्राप्ती झाली आहे. जमीन शेतीपासून मिळणाऱ्या प्रोटीनच्या पूर्ततेचा तो पुरक आहे. परंतु विश्वातील वाढत्या लोकसंख्येमुळे मनुष्याला लवकरच सागरापासून मिळणाऱ्या इतक्या मोठ्या प्रोटीनची आवश्यकता होऊ शकते की त्याची ही मुबलक आणि सतत होणारी पूर्तता देखील संकटात सापडेल. त्यासाठी मनुष्याला सागरी शेतीच्या माध्यमातून पुरेसा पुरवठा कायम ठेवण्यासाठी महत्त्वाची पावले उचलली पाहिजे.

कमी प्रमाणात मासे पालन तलाव आणि सरोवरांमध्ये पूर्वीच यशस्वीरित्या केल्या गेले. विशेषतः जलविद्युत प्रकल्पाकरिता बांधांच्या निर्मितीसाठी निर्माण करण्यात आलेल्या कृत्रिम तलावात हे कार्य केल्या गेले. गोड्या पाण्याच्या तलावात माश्यांच्या उत्पन्नाने प्रोटीनच्या पूर्ततेत आधीपेक्षा बरीच वाढ झाली आहे. त्यातील काहींचा विकास ग्रामीण समुदायात कृषीअधिकाऱ्यांच्या मदतीने आणि पर्यवेक्षणाद्वारे होत आहे.

एकदा मासे तलावांना परिपक्व माश्यांनी समृद्ध केले तर माश्यांचा निरोगी वातावरणात विकास होतो आणि त्यांच्या भोजनाची देखील पुरेशी सोय होते. पाण्यात मोठ्या संख्येने पोहणारे प्लँकटन, सूक्ष्मजीव आणि वनस्पती जलचर प्राण्यांसाठी मुख्य खाद्य आहे. लहान मासे त्यांना खातात व आपल्यापेक्षा मोठ्या माशांचे भोजन बनतात. प्लँकटन हे पाण्यातील उपस्थित खनिजांमुळे वाढतात, प्लँकटनची संख्या खतांच्या द्वारे वाढविल्या जाऊ शकते.

सागरी शेती जरी व्यावहारिक आणि फायदेशीर होऊ शकली तरी त्यातील काही समस्या प्रथम सोडवाव्या लागतील. उदाहरणार्थ सागरातील त्याभागात खते टाकणे उपयोगी नाही, जेथे सागराच्या लाटा वेगाने खतांना मैलो दूर अनुत्पादक



DOWNLOADED FROM: https://iasexamportal.com/ Courtesy : UPSC

DOWNLOADED FROM: https://iasexamportal.com/

पाण्यात घेऊन जातात. जरी मासे पालन करणारे खतांना एका ठराविक क्षेत्रापर्यंत मर्यादित करू शकले, तरी देखील त्यांना 'आपल्या क्षेत्रापर्यंत' पोषित माश्यांसाठी ठेवण्याचा उपाय शोधावा लागेल; आणि आपल्या खर्चाचा जास्तीत जास्त फायदा प्राप्त करण्यासाठी त्याला माश्यांना भोजन देण्याचा असा उपाय शोधावा लागेल की ज्यामुळे ते भोजन त्याला हव्या असणाऱ्या माश्यांनाच देता येऊ शकेल. त्यासाठी त्याला अखाद्य जलचरांना हटविण्याची (तणकट) युक्ती लावावी लागेल, ज्यामुळे तो त्याच्या माश्यांचे भोजन इतरांना देऊ शकणार नाही.

या समस्येचे निराकरण करणे पूर्णतः सोपे नाही-विशेषतः सागराची विशालता पाहता, तो पृथ्वीच्या पृष्ठभागाला जवळपास तीन-चतुर्थांश इतका घेरलेला आहे. सागराचे पाणी तलाव आणि सरोवरांच्या तुलनेत प्रवाहात सतत हलते राहते. कदाचित या समस्यांचे हळूहळू निराकरण केले जाईल. नजीकच्या भविष्यात मनुष्य महाद्वीपांच्या जवळ तटीय उथळ पाण्यात छोट्या प्रमाणात मासे पालन सुरु करू शकतो, जेथे तो अशा माश्यांचे संग्रहण करू शकतो ज्याचे त्याला उत्पादन करायचे आहे. आपल्या माश्यांच्या भोजनाला खाणाऱ्या अवांछित जलचरांना तो दूर करू शकतो. आवश्यकतेनुसार त्या क्षेत्रात खते टाकू शकतो आणि शेवटी वेळोवेळी परिपक्व माश्यांच्या पिकाला एकत्र करू शकतो.

*(a)* शिकारीच्या तुलनेत शेती कशाप्रकारे चांगली आहे आणि भविष्यात सागरी शेती का आवश्यक आहे? 12

*(b)* मासेपालनात खतांची कोणती भूमिका आहे? 12

*(c)* सागराच्या कोणत्या भागात मासेपालन सुरू केले जाऊ शकते? 12

*(d)* 'तणकट' पासून आपणास कशाचा बोध होतो? 12

*(e)* भविष्यात सागरी शेतीच्या समस्यांचे समाधान कसे करता येईल? 12

**3.** खालील उताऱ्याचा अंदाजे एक-तृतीयांश शब्दांत सारांश लिहा. उताऱ्याला शीर्षक देऊ नये. सारांश मराठीत लिहा : 60

भारताची प्रचंड लोकसंख्या ग्रामीण आहे. त्यांची सामाजिक-आर्थिक स्थिती आणि त्यांच्या जीवनातील गुणवत्तेत सुधार करण्यासाठी ग्रामीण मूलभूत सुविधेत सर्वांगीण विकासाची गरज आहे, ज्यामूळे समान आणि समावेशक विकासाच्या प्रदीर्घ घोषित उद्देशांना प्राप्त केल्या जाऊ शकेल. ग्रामीण मूलभूत चौकटीचा एक महत्त्वपूर्ण घटक पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आहे. पाणी निःसंशयपणे एक सार्वजनिक स्रोत आहे. नागरिकांची मागणी पूर्ण करण्यासाठी पाण्याच्या मूलभूत चौकटीच्या निर्मितीसाठी सार्वजनिक गुंतवणूकीत वाढ करण्याची गरज आहे. एक पाणीरोधक राष्ट्र न केवळ आपल्या नागरिकांना शुद्ध आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करेल त्याऐवजी एक स्वस्थ आणि आर्थिक स्वरूपात उत्पादक समाजाला देखील सुनिश्चित करेल, जरी भारतातील प्रचंड ग्रामीण लोकसंख्येच्या पिण्याच्या पाण्याची आवश्यकता पूर्ण करणे एक कठीण कार्य आहे. ज्याचे मुख्य कारण स्थापित पिण्याच्या पाणी पुरवठ्यातील क्षमतेतील असणारी कमी आहे आणि सामाजिक, आर्थिक विकासाचा खालील स्तर, शिक्षण आणि पाण्याचा उपयोग आणि वापराच्या बाबतीत जागरूकतेत असणारी कमतरता आहे.



DOWNLOADED FROM: https://iasexamportal.com/ Courtesy : UPSC

DOWNLOADED FROM: https://iasexamportal.com/

संविधानाचे अनुच्छेद 47 राज्यांना, सार्वजनिक स्वास्थ्ययाला चांगले बनविण्यासाठी सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करण्याचे आदेश देते. शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आजारांना आणि घातक घटकांना कमी करून जीवनसार चांगला ठेवाण्यासाठी मदत करते. देशातील करोडो लोकसंख्येच्या संपूर्ण आरोग्यात सुधारणा आणण्यासाठी शुद्ध आणि सुरक्षित पिण्याचे पाणी आणि स्वच्छतेची तरतूद करणे गरजेचे आहे.

निरंतर विकास, पाण्याची उपलब्धता आणि स्वच्छतेचे निरंतर व्यवस्थापन निश्चित करण्याच्या आवश्यकतेवर भर देते. सुरक्षित पिण्याचे पाणी पोहचण्याच्या बाबतीत 'कुणीही मागे सुटू नये' या वर्षी 'जागतिक पाणी दिवसाचा' हा मुख्य विषय होता. 'जागतिक पाणी दिवस' दरवर्षी 22 मार्च ला साजरा केला जातो.

सरकार ग्रामीण जनतेसाठी सुरक्षित पेयजल उपलब्ध करण्यासाठी लक्ष केंद्रित करीत आहे. सरकारकडून वेळोवेळी या क्षेत्रात समोर येण्याऱ्या अडचणींचा सामना करण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली जात आहे. ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या अंमलबजावणीसाठी अनुदान देण्यापासून तर अंमलबजावणी व देखरेख दृष्टिकोन आणि भूजल पुनर्भरण करण्यासाठी देखील पावले उचलली आहेत. काही अन्य उपायांमध्ये पावसाच्या पाण्याची साठवणुक देखील समाविष्ट आहे. हा अत्यंत महत्त्वाचा घटक असून ग्रामीण भागात निरंतर स्वरूपात स्वच्छ पिण्याचे पाणी पुरवण्यास उपयुक्त ठरू शकते.

ग्रामीण परिसरात कृत्रिम पुनर्भरण आणि पावसाचे पाणी साठवणूक करण्यासाठी सरकार मास्टर प्लॅन तयार करीत आहे. भारतात अशा सफलतापूर्वक घटनांची भरमार आहे, की त्यामुळे पाणी साठविण्याच्या आपल्या प्राचीन व परंपरागत ज्ञान आणि विवेकाकडे आपले लक्ष आकर्षित करते.

2001 साली तामिळनाडू सरकारने प्रत्येक परिवारासाठी पावसाचे पाणी साठविण्याची मूलभूत संरचना करणे अनिवार्य केले आहे. बेंगलोर आणि पुणे यासारख्या शहरात देखील असे प्रयोग करण्यात आले आहे, जेथे गृहनिर्माण संस्थांद्वारे पावसाचे पाणी साठविणे शक्य आहे. दुसऱ्या राज्यांमध्ये देखील अशा प्रकारचे अनेक प्रयत्न झाले आहे.

भू-जलाचा अतिउपसा भारतात एक मुख्य समस्या आहे. त्याला आळा घालण्यासाठी राज्य सरकारांद्वारे नियामक प्रणालीची आवश्यकता आहे. गंभीर स्वरूपात प्रभावित असणाऱ्या क्षेत्रात अत्याधिक विहिरींच्या खोदाईवर प्रतिबंध लावला पाहिजे. पिण्याचे पाणी पुरवण्याच्या योजना प्रभावित करण्यासाठी पंचायती राज संस्थांचा मोठा सहभाग आवश्यक आहे. सध्या पंचायतीराज संस्थांची भूमिका नगण्य आहे. ग्रामीण समुदाय, गैरसरकारी संघटना तसेच सरकारी सुविधा देणारे आणि आर्थिक मदत देणारे यांचा सहभाग महत्त्वपूर्ण आहे. आपण लक्षात ठेवले पाहिजे की ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि पुरवठा वाढविण्यासाठी आपल्याला ग्रामीण समुदायाच्या सक्रीय सहयोगाने पाण्याच्या सुसंगत रक्षणासाठी आणि उपयोगासाठी प्रत्येक उपाय करणे गरजेचे आहे.

समुदायाचा सहभाग, संचालन आणि देखरेख आर्थिक व्यवहार्यतेला चालना देते. हे अंगभूत सामुदायिकतेमुळे उत्तम देखरेख आणि तयार केलेल्या प्रणालीच्या जीवणकाळाला देखील वाढविते. पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांजवळ केवळ स्वच्छता ठेवणे



DOWNLOADED FROM: https://iasexamportal.com/ Courtesy : UPSC

DOWNLOADED FROM: https://iasexamportal.com/




# UPSC Exam *FAQs*

**About The Civil Services Examination**

- Nature of Exam
- What is UPSC?
- All India Services
- IAS | IPS | IRS | IRaS | IFoS
- Training
- Pay Scales
- Frequently Asked Questions (FAQ)

**Profile :**

- Job Profile of an IAS Officer
- Job Profile of Indian Foreign Service(IFS)
- Job Profile of Indian Railway Traffic Service (IRTS)
- Job Profile of Indian Post & Telecommunication Accounts and Finance Service Group ‘A’
- Job Profile of Indian Civil Accounts Service
- Job Profile of Armed Headquarters Civil Service
- Job Profile of Indian Corporate Law Service (ICLS)
- Job Profile of Indian Revenue Service (IRS)
- Job Profile of Indian Railway Personnel Service (IRPS)
- Job Profile of Indian Defence Estates Service (IDES)
- Job Profile of Indian Police Service (IPS)
- Job Profile Indian Audit & Accounts Service, Group 'A' (IAAS)

**Civil Services as a Career:**

- As a Career
- Salary
- Perks, Benefits & Facilities Enjoyed by IAS Officers
- Nature of Works

CLICK HERE

DOWNLOADED FROM: https://iasexamportal.com/ Courtesy : UPSC

DOWNLOADED FROM: https://iasexamportal.com/

समुदायाची महत्त्वपूर्ण भूमिका नाही तर त्या पद्धती आणि साधनांना देखील सुधारणे गरजेचे आहे, की ज्यामुळे संग्रह, साठवणूक आणि वापर करताना प्रदुषणापासून वाचण्यासाठी पाणी एकत्र करता येते.

ग्रामीण भागात या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पंचायतीराज संस्था, स्वयं सहाय्यतासमूह आणि सरकारी समित्यांच्या माध्यमातून समुदायाच्या सक्रिय सहभागाची मागणी केली जाते. त्यामुळे 2030 पर्यंत 'प्रत्येक घरी पाणी' हे ध्येय प्राप्त करता येईल आणि दीर्घकालीन टिकावू समाधान साकार हेऊ शकेल.

*( एकूण शब्द 552 )*

**4.** पुढील उताऱ्याचे इंग्रजीत भाषांतर करा : 20

जेव्हा एखादा व्यक्ती आपल्याला पाहतो तेव्हा तो आपल्याबद्दल चुकीचे अनुमान करतो. तो आपल्या उद्देशांना सहसा पाहतो. जास्तीत जास्तं वेळ चांगले उद्देश घेऊन चालत असतो आणि मानतो, मी ते जेपण कार्य करीत आहे त्याचा चांगलाच परिणाम होणार आहे. कोणत्याही व्यक्तिसाठी आपल्या कार्याचे तटस्थ मूल्यांकन करणे कठीण आहे. जे होऊ शकते आणि सहसा होते त्यात देखील तरीपण त्याच्या चांगल्या उद्देशांमधे विरोधाभास निर्माण होतात. जास्तीत जास्तं लोक काम करण्याच्या उद्देशाने येतात; आणि आपले कार्य त्या पद्धतीने करतात की जे त्यांना सुविधाप्रबळ वाटते आणि संध्यकाळी समाधानाच्या भावनेने घरी निघून जातात. ते आपल्या कार्याचे मूल्यांकन करीत नाही. तर ते आपल्या हेतुचेच मूल्यांकन करतात. असे मानले जाते की, कोणतीही व्यक्ती आपल्या कार्याला वेळेच्या आत पूर्ण करण्याचा हेतू ठेवतो आणि जर त्याला काही विलंब झाला तर ते त्याच्या नियंत्रणाच्या बाहेरील गोष्ट होते. कामात विलंब करण्याचा त्याचा कुठलाच उद्देश नसतो. परंतु त्याच्या कामाची पद्धत आणि आळशीपणा त्याच्या विलंबाचे कारण बनते, तर तो काय त्याचा हेतू असू शकत नाही?

प्रश्न हा आहे की आम्ही सहसा जीवनाशी संघर्ष करण्यापेक्षा त्याचे विश्लेषण करीत असतो. लोक आपल्या अपयशातून काही शिकण्याऐवजी किंवा त्याचा अनुभव घेण्याऐवजी त्याच्या कारणांची आणि प्रभावाची चिकित्सा करू लागतात. आपत्ती आणि संकटांच्या वेळी परमेश्वर आपल्याला पुढे जाण्याची संधी प्रदान करीत असतो. त्यामुळेच जेव्हा आपली अपेक्षा, स्वप्न आणि उद्देश नाहिसे झालेले असतात, तेव्हा विखुरलेल्या अवशेषांमध्ये डोकावून पाहिले पाहिजे. त्यात तुम्हाला दडलेली कोणतीतरी सुवर्णसंधी अवश्य प्राप्त होईल.

लोकांची कार्यकुशलता वाढविण्यासाठी त्यांना प्रेरित करणे आणि निराशेतून बाहेर पडणे प्रत्येक नेत्यासाठी नेहमी एक आव्हान असते. संघटनेत बदल आणण्यासाठी एखाद्या मामल्यात एक नेता स्वीकृती आणि प्रतिरोध यातून रस्ता शोधतो.

**5.** खालील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा : 20

Freedom has assuredly given us a new status and new opportunities. But it also implies that we should discard selfishness, laziness and all narrowness of outlook. Our freedom suggests toil and the creation of new values for old ones. We should so discipline ourselves as to be able to discharge our responsibilities satisfactorily. If



DOWNLOADED FROM: https://iasexamportal.com/ Courtesy : UPSC

DOWNLOADED FROM: https://iasexamportal.com/

there is any one thing that needs to be stressed, it is that we should put in action our full capacity, each one of us in productive effort—each one of us in his own sphere, however, humble. Work, unceasing work, should now be our watchword. Work is wealth, and service is happiness. The greatest crime today is idleness. If we root out idleness, all our difficulties, including even conflicts, will gradually disappear. Whether as constable or high official of the state, whether as businessmen or industrialist, artisan or farmer, each one is discharging the obligation to the state, and making a contribution to the welfare of the country. Honest work is the anchor to which we should cling if we want to be saved from danger or difficulty. It is the fundamental law of progress.

**6.** *(a)* खालील वाक्प्रचारांचा/म्हणींचा अर्थ सांगून वाक्यात वापर करा : 2×5=10

*(i)* कवडी कवडी माया जोडी

*(ii)* दुःख सांगावे मना, सुख सांगावे जना

*(iii)* अंगाची लाही होणे

*(iv)* गळ्यात गळा घालणे

*(v)* कुत्र्याचे शेपूट नळीत घातले तरी वाकडे ते वाकडेच

*(b)* खाली दिलेल्या कल्पनांचा *10* वाक्यात विस्तार करा : 5×2=10

*(i)* स्त्री जन्मा ही तुझी कहाणी, हृदयी अमृत नयनी पाणी

*(ii)* ग्रंथ हेच आपले गुरु होत

*(c)* खाली दिलेल्या विषयावर *20* वाक्यांचा संवाद लिहा : 10

प्रदूषण आणि वृक्षारोपन

*(d)* खाली दिलेल्या शब्दांचे समानार्थी शब्द लिहा : 1×5=5

*(i)* गरूड

*(ii)* संहार

*(iii)* सिंह

*(iv)* ढग

*(v)* आशीर्वाद



DOWNLOADED FROM: https://iasexamportal.com/ Courtesy : UPSC

DOWNLOADED FROM: https://iasexamportal.com/

(e) खाली दिलेल्या शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा : 1×5=5

(i) अतिवृष्टी

(ii) खंडन

(iii) स्वावलंबी

(iv) निरभ्र

(v) सुस्वर

★ ★ ★



DOWNLOADED FROM: https://iasexamportal.com/ Courtesy : UPSC

DOWNLOADED FROM: https://iasexamportal.com/

DOWNLOADED FROM: https://iasexamportal.com/ Courtesy : UPSC

DOWNLOADED FROM: https://iasexamportal.com/

IAS EXAM
Indian Administrative Services

UPSC PRINTED STUDY NOTES

| | | |
|---|---|---|
| Study Material for IAS (UPSC) General Studies Pre. Cum Mains (Combo) | English | CLICK HERE |
| UPSC - IAS PRE (GS+CSAT) Solved Papers & Test Series | English | CLICK HERE |
| UPSC सामान्य अध्ययन प्रारंभिक एवं मुख्य परीक्षा (Combo) Study Kit | Hindi | CLICK HERE |
| Study Material for IAS Prelims: GS Paper -1 + CSAT Paper-2 | English | CLICK HERE |
| Study Kit for IAS (Pre) GENERAL STUDIES Paper-1 (GS) | English | CLICK HERE |
| Study Kit for IAS (Pre) CSAT Paper-2(Aptitude) | English | CLICK HERE |
| आई. ए. एस. (सामान्य अध्ययन) प्रांरभिक परीक्षा (पेपर -1 + पेपर -2) | हिन्दी | CLICK HERE |
| सामान्य अध्ययन (GS) प्रारंभिक परीक्षा (Pre) पेपर-1 | हिन्दी | CLICK HERE |
| आई. ए. एस. (सी-सैट) प्रांरभिक परीक्षा पेपर -2 | हिन्दी | CLICK HERE |
| Gist of NCERT Study Kit For UPSC Exams | English | CLICK HERE |
| यूपीएससी परीक्षा के लिए एनसीईआरटी अध्ययन सामग्री | हिन्दी | CLICK HERE |
| COMPLETE STUDY MATERIAL FOR IAS PRELIMS EXAM | English | CLICK HERE |
| COMPLETE STUDY MATERIAL FOR IAS PRE+MAINS+INTERVIEW EXAM | English | CLICK HERE |
| UPSC, IAS सिविल सेवा परीक्षा संपूर्ण अध्ययन सामग्री (प्रारंभिक, मुख्य, साक्षात्कार) | हिन्दी | CLICK HERE |

DOWNLOADED FROM: https://iasexamportal.com/ Courtesy : UPSC